EXH.7/D

EXH.7/D

क्रि. किर. अर्ज नं. ४७/२०२६

मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.
यांचे कोर्टात.

ORDR
R and R
ASJ-2
17/04/

रोहित संभाजी हंकारे .......... अर्जदार

Digitally signed by RAHUL VASANT UTPAT
Date: 2026.04.17 17:39:28 +0530
DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

विरुद्ध

महाराष्ट्र सरकार .......... वि.प.

## ॲफिडेव्हीट

मी वत्सला संभाजी हंकारे, व.व. ४५, धंदा– घरकाम, रा. तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर , सत्यशपथेवर ॲफिडेव्हीट करते की,

मी वर नमूद पत्त्यावरील कायमची रहिवाशी आहे. माझे पती संभाजी शामराव हंकारे हे दि. २०/१२/२०१४ इ. रोजी मयत झाले आहेत. आम्हाला राहुल व रोहित अशी दोन मुले आहेत. माझा मुलगा राहुल संभाजी हंकारे हा दि. २३/०३/२०१९ इ. रोजी मयत झालेला आहे. त्याचा मयत दाखला या ॲफिडेव्हीट सोबत या मे. कोर्टात दाखल करत आहे. सध्या मी व रोहित आम्ही दोघेच संभाजी हंकारे यांना सरळ व कायदेशीर वारस आहोत.

रोहित हंकारे याचे वर पन्हाळा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३/२०२६ चा गुन्हा दाखल झालेला होता. सदर गुन्ह्याच्या कामी माझे पती संभाजी हंकारे यांचे नावे असणारी दुचाकी गाडी माझा मुलगा रोहित हंकारे याचेकडून जप्त केलेली आहे. सदरची गाडी परत मिळणेकरीता माझा मुलगा रोहित हंकारे याने सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी माझे पती संभाजी हंकारे यांचे नावे असणारी दुचाकी गाडीचा

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

9175721862



ताबा माझा मुलगा रोहित हंकारे यास देणेस माझी कोणतीही तक्रार अगर हरकत नाही. सदरची दुचाकी गाडी माझा मुलगा रोहित हंकारे याचे ताब्यात दिलेस मी भविष्यात कोणताही वाद उपस्थित करणार नाही. सदरची दुचाकी गाडी माझा मुलगा रोहित हंकारे यास देण्यास माझी पूर्ण संमती व मान्यता आहे.

म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुक्काम कोल्हापूर.

श्री व सं हंकारे

ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो. ॲफिडेव्हीट करणार

(ॲड. विजय पाटील)

**प्रतिज्ञा**

मी वत्सला संभाजी हंकारे, व.व. ४५, धंदा- घरकाम, रा. तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर , सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की, वरील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कोल्हापूर.

दिनांक : १७/०४/२०२६

श्री व सं हंकारे

प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by Smt. Vatsala Sambhaji Hankare of Talsande Tal: Hatkanangale who is identified by Shri V. A. Patil Adv. whom I know personally

Dated :- 17.4.26

Superintendent